# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १८.०९.२०२६ शुक्रवार**

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा गौरव :—**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीस ठाणे, सिताबर्डी, सक्करदरा व नियंत्रण कक्ष—डायल ११२ येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक १८.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील दालनात प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये, पोलीस ठाणे सिताबर्डी येथील कलम १०३(१),२३८(क),३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये दाखल गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ च्या मपोनि. शुभांगी देशमुख व पोअं. कमलेश गनेर तसेच, सिताबर्डी चे वपोनि. श्री सुहास राऊत, श्रेणी पोउपनि. विनोद तिवारी, पोहवा उमेश कसलीकर, पोहवा कमलेश मनिर, पोअं. सैयद वाहीद गफीर, अमित तिवारी व मनिष रामटेके यांनी संयुक्तपणे गुन्ह्याचा तपास करतांना मृतकाची ओळख पटवुन तसेच, प्राप्त माहीतीवरून आणि तांत्रीक तपास करून आरोपींना निष्पन्न केले व अंत्यत शिताफीने त्यांना तात्काळ अटक करून गुन्हा उघडकीस आणला. तसेच, पोलीस नियंत्रण कक्ष अंतर्गत डायल ११२ येथे कार्यरत मपोअं. पुजा पुसाम व गंगा शिरसाठ यांना दिनांक ०१.०९.२०२६ रोजी डायल ११२ वर प्राप्त कॉलचे कॉलरचे पतीने त्यांचे राहते घरी फाशी घेत असल्याबाबत आपत्कालीन कॉल प्राप्त झाल्याने, नमुद अंमलदार यांनी अवघ्या ५० सेकंदात कळमणा बिट क्र. २ यांना कॉल असाईन केल्याने, ते तात्काळ घटनास्थळी पोहोचुन व कॉलरचे घराचा बंद दरवाजा तोडून कॉलरचे पतीचा जीव वाचविला. तसेच, मपोअं. रोशनी हलमारे, पपिता चौलाये, वैशाली ढेंगे यांनी डायल ११२ चा मुख्य उद्येश म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना जलद प्रतिसाद देऊन, माहे ऑगस्ट २०२६ मध्ये दिवसपाळी व रात्रपाळी दरम्यान कॉल डिस्पॅचर यांचा कमितकमी रिस्पान्स टाईम बाबत आढावा घेतला. तसेच, पोलीस ठाणे सक्करदरा हद्यीतील एसबीआय बॅक कर्मचाऱ्यांचे अंगावर मिरची पुड टाकुन रोख ४,५३,०००/—रू. ची जबरी चोरी करुन पळणाऱ्या आरोपीस पेट्रोलींग दरम्यान बुध्दीकौशल्याने तात्काळ ताब्यात घेऊन, त्याचेकडून मुद्येमाल हस्तगत करुन उत्कृष्ट काम करणारे पोहवा शैलेष बेलेकर, राजेंद्र मोहोड, टप्पुलाल चुटे व शरदसिंग टेंभरे इत्यादी नमुद अधिकारी व अंमलदार या सर्वांना प्रशस्तीपत्रक देवुन अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

याप्रसंगी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंत परदेशी तसेच, इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.

 

**(कामगिरी)**

**मानकापुर पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक १८.०९.२०२६ चे ००.४० वा. चे सुमारास, मानकापुर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, मनोज नावाचा हद्यपार इसम गितानगर, भगवान ज्वेलर्स समोर फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तिथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मनोज एकनाथ राजुरकर, वय ३८ वर्षे, रा. गितानगर, प्लॉट क्र. ५, भालेराव किराणा दुकानाजवळ, मानकापुर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत लपविलेला एक लोखंडी कोयता कि. १५०/— रु. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक २७.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भाहका सहकलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उपायुक्त, परि.क्र. २, मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सपोआ, सदर विभाग, वपोनि. श्री. हरीष काळसेकर यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. अमित बकतवार, पोउपनि. नितीन वाघुले, पोहवा राहुल गवई, पोअं. विपीन रक्षे, प्रशांत खंडारे, धीरज भोपळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे अंबाझरी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०९.२०२६ चे १७.३० ते १८.०५ वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्यीत एलआयटी गेटजवळील सार्वजनिक रोडवर एक २२ वर्षीय इसम ज्याने अंगात पांढरा व आकाशी रंगाचा फुलबाहीचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला इसम येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळी करुन, धुमाकुळ घालत आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सचिन उर्फ छोटा डुम्मक राजेश शेलारे, वय २४ वर्षे, रा. सुर्यवंशी डेकोरेशन जवळ, अंबाझरी, नागपूर असे

सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी जुना चाकु कि. २००/—रू. .चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने जुना लोखंडी चाकु बाळगुन धुकाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. लक्ष्मीकांत आखाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. माजगांवकर यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे जरीपटका :—** फिर्यादी सौ. अंजली नितीन फुले, वय ४४ वर्ष, रा. प्लॉट क्र. ३२७, संतोषी नगर, नारा, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे अनिरुद्र नितीन फुले, वय २४ वर्षे हा दिनांक २७.०८.२०२६ चे १४.०० वा. पासुन बेपत्ता आहे. त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने कोणतेतरी आमिष दाखवून बेपत्ता केले आहे. दिनांक १७.०९.२०२६ रोजी फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे येथे कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ८ इंच, डोळे—काळे, केस—काळे, अंगात—काळा पॅन्ट व क्रिम रंगाचा शर्ट घातलेला होता. भाषा—मराठी/हिंदी बोलतो.



अनिरुद्र

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे पारडी :—** दिनांक १७.०९.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, नागोबा शिवमंदीर कापसी येथे एक अनोळखी भिक्षेकरी इसम वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे, आजारी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, लोकांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक हा भिक्षेकरी असून, त्यांचे नातेवाईकांची ओळख अद्याप झालेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पारडी येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. भागवत काळींगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**